

# गोरक्षा

## एक आंदोलन

गाईच्या संरक्षणाने राष्ट्राची सुरक्षा, गो-आधारित कृषी, गो-संस्कृती,
रोगांचा गोमय उपचार, गो-मांस भक्षण करण्याचे भयंकर परिणाम,
गो-मांसला वाढते सरकारी प्रोत्साहन, गो-हत्याचे तांडव कशा प्रकारे ?









* भारतीय संविधानात पहिला कायदा गोहत्या निषेध हा असावा - पं. मदन मोहन मालवीयजी
* जर जगात हिंदू म्हणवून जीवंत राहू इच्छित असाल तर सर्वप्रथम प्राणपणाला लावून आपल्याला गाईचे संरक्षण केले पाहिजे. - पूज्य प्रभुदत्त ब्रह्मचारी
* सरकारच्या गोहत्येच्या धोरणाचा कडाडून विरोध केला पाहिजे आणि मत देखील त्यांनाच दिले पाहिजे जे देशात पूर्णपणे गोहत्या बंद करण्याचे वचन देतील. -स्वामी रामसुखदासजी

## संस्कृती रक्षक संघाचे सेवा आयोजन


पाश्चात्य संस्कृतीचा विरोध


कत्तलखान्यांच्या विरोधात धरणे


गोरक्षा जागृती यात्रा


ध्यान योग-शिबिर


विद्यार्थी उत्कर्ष केंद्र


अन्नदेव, भोजन



युवा जागृती अभियान


योग-प्रशिक्षण कार्यक्रम



आरोग्य शिबिर

# गाईचे संरक्षण,सर्वस्वाचे रक्षण

जन्मदात्री आई तर केवळ बाल्यावस्थेतच दुग्धपान करवते परंतु गोमाता तर आयुष्यभर आपले स्वत:च्या दूध-दही-लोणी इ.ने पोषण करते. तिचे उपकार कसे फेडता येऊ शकतील ?

**गावो विश्वस्य मातर :**



तिच्या या सुंदर उपहारांनी ती आयुष्यभर आपले हितच करते. तरीही गोमातेच्या उपयोगितेपासून अनभिज्ञ होऊन सरकार चुकीच्या धोरणांनी तसेच केवळ तिच्या पालनपोषणाचा खर्च पेलवता येत नसल्याच्या बहाण्याने, त्यांना कत्तलखान्यांकडे सुपुर्त करतात, हा विकासाचा कोणता मापदंड आहे ? अशा गोमातेप्रती आपले काहीच कर्तव्य नाही का ?

# आशिया खंडातील सर्वांत मोठा कत्तलखाना भारतातच !!!

शेकडो वर्षांपासून अहिंसेचा पुजारी, भारत, आज एक हिंसक व प्रमुख मांस-निर्यात करणाऱ्या देशाच्या रूपात पुढे येत आहे. हिंदू बहुसंख्याक समाज असूनही गोवंशाची हत्या सुरूच आहे. ही मोठी विटंबना आहे, की आशियाचा सर्वांत मोठा कत्तलखाना ''देवनार'' हा इतर इस्लामीक देशात नव्हे तर भारताच्या महाराष्ट्र या राज्यात आहे, जेथे हजारो गाईंची दररोज कत्तल केली जाते. दुसरा ''अल-कबीर'' कत्तलखाना आंध्रप्रदेशात आहे. येथून हजारो-हजारो टन गोमांस विदेशात निर्यात होत आहे.

# पूज्य गोमातेशी अशी निर्दयता !

काय आपण जाणता, की ज्या गोमातेची तुम्ही पूजा करता, तिला कशा



प्रकारे निर्दयतापूर्वक मारले जाते ?

कत्तलखान्यात गाईंना मृत्यूच्या खोलखड्यात ४ दिवस उपाशी ठेवले जाते. त्या अशक्त होऊन खाली पडल्यावर त्यांना फरफटत मशीनपाशी घेऊन जातात. तेथे त्यांना फटके मारून उभे केले जाते. मशीनची एक पुली (मशीनचा गाईंना पकडणारा भाग) गाईच्या मागच्या पायांना जखडून ठेवते. त्यानंतर तिच्यावर पाच मिनिटे उकळते पाणी टाकले जाते. पुली मागच्या पायांना वर उचलते. ज्यामुळे गाई उलट्या लटकल्या जातात. मग या गाईंची अर्धी मान कापली जाते जेणेकरून रक्त बाहेर पडावे परंतु गाय मरू नये. तत्काळ गाईच्या पोटात एक छिद्र करून हवा भरली जाते, ज्यामुळे गाईचे शरीर फुगते. त्याच वेळी खाल काढण्याचे काम होते. गर्भस्त पशूचे पोट फाडून जीवंत वासराला बाहेर काढले जाते. त्याची नरम खाल (काफ-लेदर) अत्यंत महाग किंमतीत विकली जाते. आज देशात



कायदेशीर व बेकायदेशीररीत्या हजारो कत्तलखाने सुरू आहेत. जेथे दररोज लाखोच्या संख्येत पशुधन कत्तल केले जाते.

# गोहत्येचा बदला चुकता करावा लागेल

## गाय मेली तर उरले कोण ? गाय वाचली तर मरेल कोण ?

दिल्ली विश्वविद्यालयाचे दोन वैज्ञानिक डॉ. मदनमोहन बजाज व डॉ. अब्राहम तसेच दुसरे वैज्ञानिक डॉ. विजय राज यांनी आपल्या शोधांनी हे सिद्ध केले आहे की "पृथ्वी वर भूकंप व सुनामीसारख्या नैसर्गिक आपत्ती, तसेच ज्वालामुखी फुटणे हे अधिकतर ई.पी.लहरीं मुळेच होतात. या लहरीं गाय व इतर प्राण्यांना कत्तल करताना उत्पन्न होणाऱ्या दारुण वेदना व किंकाळीतून बाहेर पडतात." कत्तल होणाऱ्या गाईंच्या किंकाळीने पृथ्वीचे संरक्षण कवच म्हटले जाणारे ओझोन आवरणात २ करोड ७० लाख वर्ग किलोमिटरचे छिद्र झाले आहे. जर गाईंची हत्या अशीच चालू ठेवली तर इ.स.२०२० पर्यंत प्रलय होण्याची शक्यता निश्चित आहे. पशुहत्येमुळे पृथ्वीचे तापमान सतत वाढतच जात आहे.



## काय आपण हे जाणता ?

**देशाच्या स्वातंत्र्यकाळात** - ९० करोड गोधन

**इ.स.२००० मध्ये शिल्लक** - १० करोड

**इ.स. २०१० मध्ये शिल्लक** - जवळपास १ करोड

गोमाता चराचर जगाची माता आहे. तिचे संरक्षण करणे आपले नैतिक कर्तव्य आहे. **अथर्ववेद मध्ये येते की : "गौहत्याऱ्याला काचेच्या गोळीने मारा"** म्हणून हे भारतवासींनो ! जागे व्हा आणि गोहत्येचा प्रतिबंध

करण्यासाठी पुढे यावे. गोमाता धरतीचा गौरव आहे.

भारताच्या ४० करोड एकर जमिनीवर उत्पन्न व लहानमोठ्या भूखंडांच्या अनुकूल कृषिकार्य केवळ गोवंशच करू शकतो. गाईद्वारे प्राप्त विविध पदार्थांपासून विविध वस्तूंचे उत्पादन केले जाते जे मनुष्य-जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

# गाय पृथ्वीचे वरदान, जिचा महिमा महान

✻ गोमातेच्या दर्शनाने व गाईच्या खुरांची रज कपाळी लावल्याने भाग्य उजळते, घरात सुख-समृद्धी व शांती स्थिर होते.

✻ जेथे गाईचा निवास असतो त्या स्थानाला तीर्थभूमी म्हटले गेले आहे. अशा भूमीवर ज्या मनुष्याचा मृत्यू होतो त्याची तत्काळ सद्‌गती होते, हे निश्चित आहे. **-(ब्रह्मवैवर्तपुराण, श्रीकृष्णजन्म खंड :२१.९१.९३)**

✻ गोग्रास खाऊ घातल्याने व गाईची प्रदक्षिणा केल्याने मन:कामना पूर्ण होते. धन-संपदा स्थिर राहते व अभीष्टाची प्राप्ती होते.



✻ गाईला प्रेमाने कुरवाळल्याने ग्रहबाधा, पीडा, कष्ट इ. दूर होतात.

✻ गाईच्या रोमारोमातून गुग्गुळसारखा पवित्र सुगंध येतो. तिच्या शरीरातून अनेक प्रकारचे वायू बाहेर पडत असतात जे वातावरणाला जंतुरहित करून पवित्र करतात.

## ।। यज्ञाने जीवन रक्षा ।।

देशी गाईच्या गोवऱ्यांवर गाईचे तूप, जौ, तीळ, तांदूळ आणि खडी साखर अथवा साखर यांची आहुती दिल्याने महत्त्वपूर्ण गॅसेस उत्पन्न होतात. त्यांपैकी एक प्रोपिलीन ऑक्साईड गॅस पाऊस पाडण्यासाठी साहाय्यक आहे. 'इथिलीन ऑक्साईड' या गॅसचा संसर्गजन्य रोगांमध्ये व जीवनरक्षक औषधांच्या रूपात प्रयोग होतो. यामुळे पर्यावरण शुद्ध, पवित्र व निरोगी बनते.



यामुळेच प्राचीन काळी आपले पूर्वज, राजा-महाराजा, ऋषी-मुनी, संत-महात्मा सतत अश्वमेध, विष्णुयाग, सहस्त्रकुंडी इ. यज्ञ करत होते. यामुळे वृष्टी खूप होत होती. पर्यावरण शुद्ध व पवित्र होत होते, रोगांची साथ पसरत नव्हती.

### *अवकाशीय उर्जेचा* (Cosmic energy) *संग्राहक :*

अंतरिक्षात असंख्य तारे, नक्षत्र, सूर्य, चंद्र, ग्रह, उपग्रह आणि असंख्य आकाशगंगा आहेत. आकाशातून दिवस-रात्र अनेक प्रकारच्या उर्जेचा वर्षाव पृथ्वीवर होत असतो. त्या उर्जेला झेलण्याचे कार्य गाईची शिंगे करतात. गाईच्या शिंगांचा आकार पिरामिडसारखा असतो. हे एक शक्तिशाली 'ॲन्टेना' आहे. शिंगांच्या मदतीने गाय सर्व अवकाशीय उर्जांना आपल्या शरीरात साठवते आणि तीच उर्जा आपल्याला गोझरण, दूध आणि शेणाद्वारे प्रदान करते. याशिवाय गाईच्या पाठीवर वशिंड असते जे सूर्य-अवकाशीय तत्त्वांना आपल्या शरीरात दूध, गोझरण व शेणाद्वारे प्रदान करते. गोमूत्र अवकाशीय ऊर्जेचे भंडार आहे.

# गोमूत्र चिकित्सा



गोमूत्र विषाणुनाशक, रक्तविकार व वात-पित्त कफजन्य विकारांना दूर करणारे एक श्रेष्ठ व पवित्र रसायन द्रव्य आहे. हे शारीरिक व मानसिक दोन्ही प्रकारच्या रोगांचा नाश करते. गोझरण सूक्ष्म जंतू नाशक (ॲन्टीबायोटिक) आहे व सत्त्वगुणाची वृद्धी करते. हे शरीरात पांढऱ्या पेशींची वृद्धी करून रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. याच्या सेवनाने शरीरातले विष, मल-मूत्र व घामाद्वारे बाहेर पडते.

गोझरण शरीरासाठी आवश्यक विटामिन ए,बी,सी,डी आणि इ ची कमतरता पूर्ण करते. याच्या सेवनाने प्राणशक्तीचा विकास होतो. हे मूत्रपिंडासंबंधी रोग दूर करून त्याची सक्रियता व क्षमता वाढवते.

✻ **मलावरोध निवारक** : गोझरण मलावरोध दूर करून आतड्यांवर जमलेला जुना मल दूर करते. लघवी करताना त्रास होणे, लघवी थांबत-थांबत होणे किंवा वारंवार लघवीला जाणे, थकव्याचा अनुभव होणे हे सर्व त्रास गोझरणाचे सेवन केल्याने दूर होतात व स्नायू सक्रिय होतात. मलावरोध अधिक असेल तर गोझरणात दोन ते तीन ग्राम हरड चूर्ण मिसळून ४५ दिवस दररोज घ्यावे, सेवनाच्या अर्धा तास पूर्वी व नंतर काहीच घेऊ नये.

✻ **कृमिनाशक** : गोझरण कृमिनाशक आहे. १०-२५ मि.ली. गोझरण बालकांना दिल्याने त्यांच्या पोटातील सर्व कृमीं नष्ट होतात. (मोठ्यांसाठी ५०मि.ली.).

✻ **अपचन-मंदाग्नी :** मंदाग्नीच्या रुग्णांना आहार पचत नाही, भूक लागत नाही, पोट जड वाटते, अस्वस्थता आणि आळस येत राहतो. या रुग्णांनी ५० मि.ली गोझरणात एक चमचा सुंठ, अर्धा चमचा पिपरामूल व दोन चमचे मध टाकून मग घ्यावे. हा प्रयोग ४५ दिवस करावा.

✻ **वेदनाशामक :** गोझरणात वेदनाशामक तत्त्व विपुल प्रमाणात आहेत. याच्या सेवनाने गुडघे दु:खी, कंबर दु:खी, डोके दु:खी, स्नायूंचे दुखणे इ. अनेक प्रकारच्या वेदनेत आराम मिळतो. स्नायूच्या दुखण्यात गोझरणाने मालीश केली तर आराम मिळतो. दातांच्या दुखण्यात गोझरणाच्या गुळण्या केल्याने आराम मिळतो.

✻ **गुडघे दु:खी व संधिवात :** दोन चमचे एरंडेल तेल आणि एक चमचा सुंठ चूर्ण गोझरणात मिसळून गरम करावे. खूप हलवल्यानंतर घ्यावे. यामुळे सर्व वेदना दूर होतात.

✻ **जिभेचे रोग :** तंबाखू वगैरे व्यसनात अथवा इतर एखाद्या कारणाने स्वाद किंवा रसाची जाण होत नसेल तर गोझरणाच्या गुळण्या केल्याने स्वादेंद्रिय सचेत होते.

✻ **डोळे :** गाळलेले गोझरण प्यायल्याने व डोळ्यात टाकल्याने नेत्रज्योती वाढते. चष्म्याचा नंबर कमी होतो. डोळ्यातून पाणी पडणे, डोळे लाल होणे वगैरे रोग दूर होतात. गाईच्या तुपाचे अंजन लावल्याने नेत्रज्योती चमत्कारिकरीत्या वाढते.

✻ **कान** : गाळलेले गोझरण प्यायल्याने आणि कानात टाकल्याने कानाचा मळ दूर होतो, पू येणे, कानात खाज सुटणे बंद होऊन श्रवणशक्ती वाढते.

✻ **त्वचारोग** : गोझरण प्यायल्याने तसेच गाईच्या शेणाचा रस व गोमूत्र मिसळून मालीश केल्याने त्वचेचे बंद छिद्रे मोकळे होतात, चर्मरोग दूर होतो आणि घाम नियंत्रित होतो.

✻ **स्थूलता नाशक :** गोझरण वात व कफ शामक आहे. हे अतिरिक्त चरबी कमी करून स्थूलता कमी करते. शरीराला सडपातळ व सुडौल बनवते. स्थूलता अनेक रोगांचे मूळ आहे.

✻ **रक्तवसा (कोलेस्ट्रोल) नियंत्रण** : गोझरणात अनेक प्रकारचे आम्ल (ॲसिड) व सुपाच्य यूरिक क्षार असतात जे कोलेस्टेरॉल दूर करून रक्ताला स्वच्छ, जंतुरहित व पातळ ठेवते.

✻ **उत्कृष्ट जंतुनाशक (एंटीसेप्टिक) :** शारीरिक जखमांना गोमूत्राने धुतल्याने व जळलेल्या भागांवर गोझरण लावल्याने जखमा पिकत नाही. जखमेवर गोझरणाची पट्टी केल्याने जंतुंचा नाश होतो.

✻ **प्रभावशाली कीटाणुनाशक :** गोझरणात १६ प्रकारचे आम्ल(ॲसिड) आढळून येतात. हे ॲसिडस वातावरणाला जंतुरहित करून पवित्र व आरोग्यप्रद बनवतात. यामुळेच हिंदू धर्माचे सर्व सोळा संस्कार व धार्मिक कार्य करण्यापूर्वी गोझरण व गाईच्या शेणाचा उपयोग केला जातो.

✻ **उत्तम विषनाशक :** विषारी रासायनिक खत व जंतुनाशक औषधांमुळे धान्य, पाले भाज्या, फळ-भाज्या, फळे वगैरे विषारी बनतात जे खाल्ल्याने शरीरातही विष पोहोचते. ॲलोपॅथीच्या औषधांनीही शरीरात विष निर्माण होते. हे सर्व प्रकारचे विष शरीरात जमा होऊन कालांतराने कॅन्सरसारख्या घातक रोगांना जन्म देते. अशा सर्व प्रकारच्या विषाचे शमन करण्यात गोझरण सफल आहे.

✻ **पित्ताशय-रक्षक :** गोझरण हे पित्ताशयासाठी एक गुणकारी व बलप्रदायक औषध आहे. पित्ताशय कमजोर झाल्याने कावीळसारखा रोग होण्याची शक्यता असते. गोझरण पित्ताशयाचे रोग दूर करून त्याची कार्यप्रणाली नियमित करून त्याला कार्यशील बनवते.

✻ **ग्रंथि भेदन** : गोझरणात अनेक प्रकारचे आम्ल(ॲसिड) असल्याने

कॅन्सरच्या गाठींना मग त्या रक्त मिश्रित असो, मेंदूत असो किंवा शरीराच्या इतर कोणत्याही भागात असो, त्यांना विरघळण्यात मदत करते. हे (ॲसिड) मूत्रपिंड किंवा मूत्राशयाचा खडा देखील विरघळून शरीरातून बाहेर काढते.

✻ **मेंदू बलदायक :** गोझरण ज्ञानतंतुंना कार्यशील आणि गतिशील बनवते ज्यामुळे स्मरणशक्ती व बुद्धिशक्ती वाढते. हे मेंदूला शक्ती प्रदान करते. अपस्मार अथवा मिर्गीसारख्या मेंदूच्या रोगांना दूर करण्यात गोझरण मदत करते.

✻ **मधुमेह** : दवसातून ३ वेळा ५० मि.ली गोझरण घ्यावे. गोड पदार्थांचा त्याग करावा. भात, बटाटा, तळलेले व स्निग्ध पदार्थ घेऊ नये. सकाळ-सायंकाळ एक-एक तास शीघ्र गतीने चालावे व योगासन, व्यायाम किंवा सूर्यनमस्कार करावे.

✻ **त्वचेचे रोग (सोराइसिस, गजकर्ण-खरूज-खाज) :** त्वचेच्या रोगांसाठी गोझरण व गाईचे शेण रामबाण उपाय आहे. सर्वप्रथम गोझरणाने मालीश करून घ्यावे व मग शेणाने मालीश करावी. त्यानंतर शेणाचा घट्ट लेप करून लावावा. मंद उन्हात अर्धा तास बसावे आणि मग पुन्हा गोझरणाने मालीश करावी. एका तासाने कडुंलिबाची पाने टाकून उकळलेल्या पाण्याने स्नान करावी. सकाळ-सायंकाळ ५० मि.ली. गोझरण प्यावे. जेवणात आंबट, तेलकट पदार्थ घेऊ नये. काही दिवस मीठ खाणे बंद करावे अथवा कमी करावे.

## गोझरणाच्या उपयोगात सावधगिरी

केवळ स्वस्थ देशी गाईच्या झरणाचेच सेवन करावे. गोझरणाला तांब्याच्या किंवा पितळ्याच्या भांड्यात ठेवू नये. मातीच्या, काचेच्या, चीनी मातीच्या किंवा स्टीलच्या भांड्यात ठेवू शकता. ताजे गोझरण २४

तासापर्यंत सेवन करण्यास योग्य मानले जाते. झरणाचा अर्क दीर्घकाळासाठी वापरू शकता.

गोझरण अर्क सकाळी अनशापोटी पाणी मिसळून त्यासंबंधी दिलेल्या निर्देशानुसार घ्यावे. गोझरण पिण्याच्या एक तासापूर्वी व नंतर काहीच खाऊ नये. सेवनाचे प्रमाण देश, ऋतू, प्रकृती, आयू इ. अनुसार बदलत असते. सामान्य व्यक्ती ५० ते १०० मि.ली पर्यंत गोझरण सेवन करू शकते.

## 'गौ स्वास्थ्य वर्धिनी' उपयोगी उपचार

(क) लहान मुलांना कोरडा खोकला झाल्यावर गोझरणात हळदीचे चूर्ण मिसळून द्यावे.(ख) जलोदरच्या रोगात रुग्णाने केवळ गोदुग्धाचे सेवन करावे. गोझरणात मध मिसळून नियमित निर्देशानुसार घ्यावे. (ग) प्रसूतीनंतर होणाऱ्या बाळंतीणीच्या रोगात गोझरण लाभदायक आहे. (घ हत्ती रोगात गोझरण सकाळी अनशापोटी घ्यावे. (ड) गोझरण डोक्यावर चांगल्या प्रकारे रगडावे व ते वाळल्यावर धुऊन काढावे. यामुळे केस सुंदर होतात.(च) गोझरणात जुना गूळ व हळदीचे चूर्ण मिसळून प्यायल्याने गजकर्ण, कुष्ठरोग आणि हत्ती रोगात लाभदायक होते. (छ) उच्च रक्तदाब (हाय ब्लडप्रेशर) च्या रुग्णांनी दररोज ५० ग्राम गोझरण सकाळ-सायंकाळ घ्यावे. (ज) १ ते ३ ग्राम मोचरस खडीसाखर टाकलेल्या दुधाबरोबर घेतल्याने स्वप्नदोष दूर होतो.(झ) काकडसिंग पाण्यात घोटून लगदा बनवावा. मग तो दुधात मिसळून प्यावे. यामुळे शक्ती येते. प्रमाण मोठ्यांसाठी १ ते ३ ग्राम व बालकांसाठी ०.५ ग्राम.

❋ **गोदुग्ध :** गाईचे दूध पृथ्वीवर अमृत आहे. हे संपूर्ण आहार आहे, तसेच एक अमूल्य औषध देखील आहे. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत, वृद्ध सर्वांसाठी उपयोगी आहे. हे बल, बुद्धी, स्मृती व रक्तवर्धक व आयुष्य वाढवणारे रसायन आहे. 'चरक संहिता' यात येते की **प्रवरं जीवनीयानां**

**क्षीरमुक्तं रसायनम** । अर्थात् 'गोदुग्ध जीवनशक्ती वाढवणारे श्रेष्ठ रसायन आहे.' यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते, बुद्धी कुशाग्र होते.

✼ **गौदधी :** गाईच्या दह्यात उत्पन्न सूक्ष्म जीवाणू आतड्यांमध्ये विषाणूच्या उत्पत्तीला थांबवतात. दही घुसळून योग्य प्रमाणात घेतल्याने भूक व पाचनशक्ती वाढते. कॅन्सरसाठीही दही एक परिणाम कारक औषध आहे.

## ✼ परम पवित्र पंचगव्य ✼

पंचगव्य हे, गाईचे दूध, दही, तूप, गोमूत्र व गाईच्या शेणाचा रस यांचे मिश्रण निश्चित प्रमाणात घेऊन बनवले जाते. पंचगव्य मनुष्याचे शरीर शुद्ध करून निरोगी, सात्त्विक व बलवान बनवते. याच्या सेवनाने शरीराचे, मनाचे व बुद्धीचे विकार



दूर होऊन आयुष्य, बल व तेजाची वृद्धी होते. पुढील मंत्र तीन वेळा उच्चारण करून मग अनशापोटी पंचगव्य घ्यावे. पंचगव्य सेवनाचा मंत्र :

**यत् त्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठति मामके ।**
**प्राशनात् पंचगव्यस्य दहत्वग्निरिवेन्धनम् ।।**

# ।। गो-संस्कृती ।।

शेती, गोपालन, बागायती आणि या तिघांशी संबंधित उद्योगांवर आधारित एक जीवन शैली टिकून आहे "गो-संस्कृती" अर्थात् विविध कृषिप्रणाली वर आधारित जीवन व्यवस्था आहे.

✼ गो-संस्कृती आधुनिक विज्ञानाच्या अत्याधुनिक सिद्धान्त व शोधांच्या आधारित तथ्यांवर टिकून आहे.

✼. ही जीवन पद्धती नैसर्गिक पर्यावरणाच्या शुद्धतेशी कमीत कमी विसंगती आणून अर्थात् जे काही प्राणी-पशू, पक्षी, पाणी, जीव, जीवाणू वगैरे

आहेत त्यांच्याशी समतोल साधून जीवन जगण्याची रीत आहे.

❋ गाईचे शेण रेडिओ लहरींना शोषूण घेते तसेच ईंधन, खत यांचा पुरवठा करते.

❋ गोसेवा केंद्रित जीवन-पद्धती, गोशाळा केंद्रित ग्रामोद्योग आणि गोचर केंद्रित शेतीचा स्थायी, संपूर्ण व संतुलित विकास शक्य आहे.



❋ अर्धा टन वजनाची गाय रात्रं-दिवस १२०० वाट उष्णता देते. गोवंश जवळपास ३० हजार मेगावाट ऊर्जा देतो. गाईंसाठी गोशाळा आश्रय स्थळ आहेत जी ऊर्जा केंद्र बनू शकता.

❋ गोधनाने विकसित धान्य व धन मनुष्याला हृदयहीन व स्थूल होण्यापासून वाचवेल.

❋ आधुनिक सभ्यता नैसर्गिक संपदेचा अंदाधुंद वापर करून तिला नष्ट करीत आहे. मागील ५०-६० वर्षांपासून संपूर्ण विश्वाचे पर्यावरण खूपच प्रदूषित झाले आहे. विश्वाचे सर्व सुज्ञ वैज्ञानिक या स्थितीने चिंतित आहेत.

## गो आधारित कृषी

**(क)** रासायनिक खतांच्या प्रयोगाने जमिनीवर वाईट परिणाम होतो व दीर्घकाळ यांचा वापर केल्याने जमीन नापीक बनते.

**(ख)** आधुनिक कृषी पद्धतीत रासायनिक कीटनाशकांची हीच भूमिका आहे. धान्य, फळ आणि भाजीच्या उत्पादनात यांचा थोडाफार उपयोग तर होतो परंतु सतत यांचा वापर स्थानीय पर्यावरणाला अर्थात् जमीन, पाणी आणि




हवेला विषारी बनवते. ही पद्धती पुन:पुन्हा वापरल्याने जवळपासच्या सर्व प्राण्यांना, मनुष्य, पाळीव पशू, किटक-पतंग आणि शेताच्या मातीतल्या जीवाणूंवर जीवघेणा प्रभाव पाडते.

**(ग)** पारंपारिक अर्थात प्राचीन कृषी पद्धतीत गाईच्या शेणाचा उपयोग ईंधनासाठी किंवा शेतीसाठी खत तयार करण्यासाठी होत होता. आज आपण गोबर गॅस प्लांट, जैविक कम्पोस्ट खत, बॅटरी उत्प्रेरक आणि गांडूळ खत इ.मध्ये गाईच्या शेणाचा अत्याधिक उपयोग केला पाहिजे.

**(घ)** गोरसाचा पूर्वी केवळ नावाला उपयोग होत होता परंतु आजकाल गोमूत्र औषध किंवा चिकित्सा आणि गोमय शेतीसाठी अत्यंत लाभदायक सिद्ध झाले आहे.

**(ङ)** डीजल व पेट्रोलच्या वाढत्या किंमतीमुळे भारतात ट्रेक्टरांपेक्षा अधिक नांगरणी आणि ट्रकांपेक्षा अधिक काम बैलांद्वारे करवून आत्मनिर्भर बनले जाऊ शकते.

**(च)** कृषीसाठी गोमूत्र व गाईच्या शेणाचे खत एक नैसर्गिक औषध आहे. ज्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. ही पद्धत भारतात हजारो वर्षांपासून चालू आहे.

**(छ)** गोमूत्राला जेव्हा धोतरा, कडुलिंब किंवा तुळस व अधिक प्रमाणात पाणी मिळवून त्यात उकळविले जाते तेव्हा त्याचा शुद्ध कीटनाशक म्हणून उपयोग होतो.

# गोहत्येच्या प्रतिबंधनात आपले योगदान काय असावे ?

✻ गाईचे दूध, दही, तूप, गोझरण व गोझरणयुक्त फिनाईल तसेच गाईच्या शेणापासून निर्मित वस्तूंना आपण आपल्या दैनंदिन जीवनात अवश्य वापरावे. गाईद्वारे प्राप्त या सर्व वस्तूंचा अत्याधिक उपयोग करणेसुद्धा गाईची सेवा आहे.

✻ रोजगाराची नवीन संधी देण्याच्या दृष्टीने गोपालन सर्वात चांगले साधन आहे. गो-आधारित उद्योग : फिनाईल, धूपबत्ती, उदबत्ती, अन्न सुरक्षा गोळ्या , डास निरोधक कॉइल, गोमय शेम्पू, भांडी घासायची पावडर, गोरस भंडार, गोबर गॅस प्लांट इ.

✻ गाई कसाईंना विकू नये. गाईच्या चमड्यापासून बनलेल्या वस्तूंना जसे जोडे, टोपी, बेल्ट, पर्स वगैरेचा वापर मुळीच करू नये.

✻ हिंदू संस्कृतीत हा नियम होता की जेवणातून गाईसाठी गोग्रास काढला जात असे, जो आपण विसरलो आहोत. म्हणून आजपासून आपण हा नियम घेऊ या की दररोज जेवणातून गाईसाठी गोग्रास काढू.

✻ गाईला गोग्रास देण्याचा आग्रह ठेवा. शेतकरी कुटुंबांनी व ज्यांच्याकडे जागा असेल त्यांनी गोपालन करून गोसेवेचे पुण्य व स्वास्थ्य-लाभ घ्यावा.

गोमातेची दुर्दशा पाहून तिच्या रक्षणार्थ भारताच्या अनेक विद्वानांनी बलिदान दिले. पूर्वकाळातले करपात्रीजी महाराज, संत प्रभुदत्तजी ब्रह्मचारी, आचार्य विनोबा भावे वगैरे अनेक संत-महात्मांनी व समाज सेवकांनी गोवध विरुद्ध आंदोलन चालवले.

सद्यस्थितीत गोरक्षा व देशाच्या सांस्कृतिक परंपरेच्या संरक्षणासाठी 'संस्कृती रक्षक संघ' ने क्रांतीचा शंखनाद केला आहे. चला, आपण सर्व जण एकजुटीने गाय व संस्कृतीची रक्षा करण्यासाठी पुढे होऊ या.

# गोमांस भक्षणाचे भंयकर दुष्परिणाम

(१ ) गोमांस एक घातक विषाणूला COLI-0157-H-7 ला शरण देते ज्यामुळे संपूर्ण अन्न विषारी होते.

(२) गोमांसात डायोक्सिन (DIOXIN) ामक विषारी ऑर्गेनिक (Organic) रसायन पुरेशा प्रमाणात असते, ज्यामुळे कॅन्सर, अन्डोमीटिरियोसिस, अक्षमता, सतत थकवा, नाडीरोग, रक्तविकार तसेच रोगप्रतिरोधक क्षमतेचा ऱ्हास वगैरे अशा अनेक रोगांचा जन्म होतो.

(३) गोमांस व मज्जा भक्षणाने B.S.E., C.J.D. सारखे घातक व भयानक जीवघेणे रोग निर्माण होतात. B.S.E., C.J.D. चा काहीच उपचार नाही. हे रोग एडस पेक्षाही घातक आहेत. B.S.E.मेंदूचा व C.J.D. सारखा रोग कुटुंबात अनुवंशिक एका पिढीपासून दुसऱ्या पिढीत संक्रमित होतो. अशा प्रकारे गोमांस भक्षणाने तो वंश समाप्त होतो.

(४) गोमांस भक्षण केल्याने मनुष्य शरीरात प्रोस्टेगलेंडीन नामक हार्मोस उत्पन्न होतात. जे हृदयरोग आणि पक्षाघातासारख्या प्राणघातक रोगांना जन्म देते.

(५) गोमांसामध्ये लांब कार्बन श्रृंखलावाले प्रोटीन असतात त्यामुळे गोमांस भक्षक वातरोग व संधिवाताच्या रोगांना बळी पडतात.

(६) यूनानी चिकित्सा शोधाने असा निष्कर्ष काढला गेला की गाईचे मांस खाल्ल्याने वेड लागणे, संधिवात आणि कोड वगैरे रोग होऊ शकता.

(७) हृदयरोग विशेषज्ञ सल्ला देतात की गाय वगैरे पशूंचे मांस अचानक हृदयाची गती थांबवण्यात प्रमुख भूमिका निभावते.



# गाईचे वैज्ञानिक महत्त्व व लाभ



१. एक महान रशियन वैज्ञानिक शिवोरिच अनुसार गाईच्या दुधात ‘‘आण्विक हानिकारक किरणांना थांबवण्याची क्षमता आहे.’’

२. गाईच्या शेणाने सारवलेले घर हानिकारक किरणांचे विरोध करते.

३. सूर्याच्या गोकिरणांना शोषित करण्याची क्षमता केवळ गाईतच आहे. गाईच्या दुधात सुवर्णक्षार आढळून येतात.

४. गाईंच्या चालण्याच्या आवाजाने सर्व मानसिक दुर्गुण व रोग दूर होतात.

५. मद्रासचे प्रसिद्ध डॉ. किंग यांच्या अनुसार गाईच्या शेणात पटकी (कॉलेरा) रोगाच्या कीटाणूंना नष्ट करण्याची शक्ती आहे.

६. क्षयरोगाच्या रुग्णांना जेव्हा गोशाळेत ठेवतात तेव्हा त्यांचा गाईचे शेण व गोमूत्राच्या सुगंधाने उपचार होतो.

७. हे सिद्ध झाले आहे की गोमूत्रात तांबे आहे जे मनुष्य शरीरात जाताच सुवर्णात परिणत होते ज्यात रोग-प्रतिरोधक क्षमता आहे.

८. गाईला पृथ्वीचा सर्वात मोठा वैद्यराज (चिकित्सक) मानले गेले आहे.

**संदर्भ :**

✻ गौसेवा अंक (गीताप्रेस गोरखपुर) ✻ चित्रमय चेतावनी - सत्यनारायण मौर्य

✻ गौवध भारत का कलंक एवं गाय का माहात्म्य, लेखक - हनुमान प्रसाद पोद्दार

✻ लोक कल्याण सेतु अंक :६२ ✻ गौ-विज्ञान प्रशिक्षण - सुरभि शोध संस्थान

✻ गोझरण महौषधि : राजस्थान गौसेवा आयोग ✻ protectin of cow - clan

✻ गौरक्षा - राष्ट्ररक्षा, गौसेवा - जनसेवा, लेखक - गौरीशंकर भारद्वाज

✻ राष्ट्र के अर्थतंत्र का मेरूदण्ड गौशाला - शांति कुंज, ✻ गौपालन एवं गौशाला प्रबंधन संदर्शिका (शांति कुंज, हरिद्वार)

मराठी



वात्सल्यमूर्ती आई गोमाता




१८५७ ची क्रांती- गोहत्येचा विरोध

## गोहत्येच्या प्रतिबंधनात आपले योगदान काय असावे ?

- गाईचे अत्याधिक संख्येत पालन करावे तसेच इतरांनाही त्यासाठी प्रेरित करावे.
- ज्या घरात गाय नाही किंवा गाईची सेवा-पूजा होत नाही ते घर, घर नव्हे स्मशान आहे.
- अनोळखी व्यक्ती व कसाईंना पशु विकू नये. गोवंशाला बाहेर एकटे सोडू नये.
- यथाशक्य गाईचे दूध, ताक, तूप इत्यादींचे सेवन करावे मग त्यांची किंमत कितीही असो.
- जी गाय दूध देत नाही तीसुद्धा उपयोगी आहे. गो-आधारित उद्योग सुरू करावा.

## गो-आधारित उद्योग



कृषि उद्योग



गांडूळ खत



गो किटनाशक दवाएँ



गोबर गॅस



गोमय सौंदर्य प्रसाधन (फेस पॅक)



गोधूप-बत्ती



पंचगव्य घृत



गो-साबण



गोझरण अर्क



गो फिनाईल



वेदनाशामक तेल



गो-लोशन



गोमय मलम



कामधेनू शॅम्पू











डास निरोधक कॉइल, दंतमंजन, गोमय [illegible], अन्न सुरक्षा गोळ्या  गोझरण वटी  दूध, दही, लोणी, ताक, तूप, मिठाई






- १९५१ मध्ये दर १००० जनसंख्येवर ४३० पशू होते ते आज केवळ २० राहिले आहेत.
- स्वातंत्र्यापूर्वी भारतात ३०० कत्तलखाने होते, आज ३६,००० हून अधिक कायदेशीर व ३०,००० हून अधिक बेकायदेशीर कत्तलखाने चालू आहेत.
- 'देवनार' (मुंबई) आशिया खंडातील सर्वात मोठा कत्तलखाना आहे.
- कत्तलखान्यात दरवर्षी २७,४६,००० पशूंची कत्तल केली जाते.
- भारत सरकारची दरवर्षी ३५ लाख टन गोमांस निर्यात करण्याची योजना आहे. या योजनेची अंमलबजावणी झाल्यावर भारत विश्वात गोमांसचा सर्वात मोठा निर्यात करणारा देश बनेल.
- कत्तल होणाऱ्या गाईच्या किंकाळीने पृथ्वीचे रक्षा कवच ओजोन आवरणात २ करोड ७० लाख वर्ग किलोमीटरचे छिद्र झाले आहे, ज्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे.
- भूकंप, सुनामी, नैसर्गिक आपत्तीचे कारण कत्तल होणाऱ्या गाईंची चीत्कार आहे.
- गोहत्या अशीच चालू राहिली तर इ.स. २०२० पर्यंत प्रलय संभवतो. त्वरित गोहत्या थांबवावी.
- गो-संस्कृती, गो-आधारित कृषी विज्ञानाला प्रोत्साहन व गो हत्येवर प्रतिबंध आवश्यक करावा.
- गाईंचे दूध, दही, तूप, शेण, गोमूत्र संपूर्ण आरोग्य व विविध रोगांवर उपचार शक्य आहे.
- गोमांस भक्षणाचे भयंकर परिणाम व त्यामुळे होणाऱ्या रोगांचा उपचार अशक्य आहे.

**हे पुस्तक लोकहितासाठी प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक कोणीही छापवून अथवा मागवून वितरित करू शकतो. देशाचे हे सेवाकार्य कोणीही करू शकतो, खरा देशभक्त देशहितासाठी अवश्य करेल असा आम्हांला विश्वास आहे.**

# संस्कृती रक्षक संघ

## आध्यात्मिक भारत निर्माण

मुख्यालय : शास्त्री नगर, दिल्ली-110031. फोन : 011-32674126.
info@srsinternational.org www.srsinternational.org